# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:23.01.2025** **वारःगुरुवार**

---

**ठळक बातम्या**

• दावोस आर्थिक मंच परिषदेत महाराष्ट्राचे आतापर्यंत 15 लाख 70 हजार कोटींचे सामंजस्य करार• कच्च्या तागाच्या किमान आधारभूत किंमतीत करण्याचा सरकारचा निर्णय, 40 लाख ताग उत्पादक कुटुंबांना मिळणार फायदा

• राष्ट्रीय आरोग्य मोहिमेला दोन वर्षांची मुदतवाढ, माताबाल आरोग्य, रोग निर्मूलन क्षेत्रात लक्षणीय प्रगती केल्याचं गोयल यांचं प्रतिपादन

• अमेरिकेच्या जन्मसिद्ध नागरिकत्व रद्द करण्याच्या निर्णयावरुन राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्यावर खटला.

• जळगाव रेल्वे अपघातात 12 प्रवासी ठार,

आणि

• वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेतील पहिल्या सामन्यात भारताचा इंग्लंडवर सात गडी राखून विजय.

**महाराष्ट्रकरार**

स्वित्झर्लंडमध्ये दावोस इथं सुरू असलेल्या जागतिक आर्थिक मंचाच्या वार्षिक परिषदेत महाराष्ट्रानं दोन दिवसांत 15 लाख 70 हजार कोटी रुपयांचे 54 सामंजस्य करारांवर स्वाक्षरी केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल विविध उद्योगसमूहांशी बैठकीचं सत्र सुरू ठेवलं होतं. या करारांमुळं अंदाजे 16 लाख रोजगार निर्मितीची अपेक्षा आहे. त्यापैकी एक महत्त्वाचा करार एमएसएन होल्डिंग्ज लिमिटेडसोबत झाला असून, त्यात राज्याच्या 'अल्ट्रा मेगा प्रोजेक्ट' उपक्रमांतर्गतच्या प्रगत लिथियम बॅटरी आणि सेल उत्पादन प्रकल्प स्थापन करण्याच्या योजनेचा समावेश आहे. यामुळे विदर्भाच्या विकासावर लक्ष केंद्रीत करून 8760 प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार निर्मीत कऱण्याचा उद्देश आहे. रिलायन्स कंपनीबरोबर झालेल्या करारामुळे पेट्रोरसायनं, पॉलिस्टर, अक्षय ऊर्जा, जैवऊर्जा, हरित हायड्रोजन, आदरातिथ्य आणि स्थावर मालमत्ता इत्यादी उद्योग क्षेत्रात 3 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक होण्याची अपेक्षा आहे. तर ॲमेझॉन कंपनी देखील महाराष्ट्रात 71 हजार 795 कोटी रुपयांची मोठी गुंतवणूक करणार असून त्यातून 83 हजार 100 रोजगारांची निर्मिती होणार आहे.

गेल्या दोन दिवसांत झालेल्या करारांमधून राज्याच्या सर्व भागात गुंतवणूक केली जात असून त्यामुळे समतोल विकासाचा उद्देश साध्य होईल असं चित्र निर्माण झालं आहे. राज्याची अर्थव्यवस्था 1 ट्रिलियन डॉलर्स करण्याचे उद्दीष्ट साध्य करण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर दिला आहे.
याशिवाय ह्युंदाई, डीपी वर्ल्ड, सिस्को, ब्रिटनचे माजी प्रधानमंत्री टोनी ब्लेअर, एन टी टी डाटा या कंपन्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत मुख्यमंत्री फडणवीस आणि उद्योगमंत्री उदय सामंत यांनी काल चर्चा केली. या कंपन्यांही राज्यात गुंतवणूक करण्यासाठी इच्छुक आहेत.

**मंत्री मंडळनिर्णय**
केंद्र सरकारनं 2025-26 या विपणन वर्षासाठी कच्च्या तागाच्या किमान आधारभूत किंमतीत वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. कच्च्या तागासाठी प्रति क्विंटल पाच हजार 650 रुपये दिली जाणार असून ती गेल्या वर्षीच्या तुलनेत 315 अधिक असल्याची माहिती काल दिल्लीत केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी मंत्रीमंडळाच्या बैठकीनंतर दिली. सरकारच्या या निर्णयाचा फायदा 40 लाख ताग उत्पादक कुटुंबाना होणार आहे. कच्च्या तागाच्या किमान आधारभूत किंमतीत सहा टक्के वाढ केली असून ती उत्पादन खर्चापेक्षा साधारण 67 टक्के अधिक असल्याचं गोयल म्हणाले. राष्ट्रीय आरोग्य मोहीम पुढील वर्षीपर्यंत सुरू ठेवण्याचा निर्णय मंत्रीमंडळानं घेतला. गेल्या तीन वर्षात माता बाल आरोग्य, रोगनिर्मूलन आणि आरोग्य काळजीमध्ये सुधारणा होऊन विविध क्षेत्रात महत्त्वाची प्रगती केली असल्याचं सांगून उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी देशभरात 1990 नंतर मातामृत्युदरात 83 टक्के घट झाली असल्याची माहिती दिली. क्षय रुग्णांमध्येही घट झाल्याचं सांगून दर एक लाख लोकसंख्येमागे 2023 मध्ये 195 क्षयरोगी आढळले, तर या आजाराचा मृत्युदरही 28 पासून 22 टक्क्यांपर्यंत कमी झाला आहे अशी माहिती गोयल यांनी दिली.

**बेटी बचाओ नड्डा**
बेटी बचाओ बेटी पढाओ अभियानांच उद्दीष्ट केवळ मुलींना शिक्षित करणं नसून त्यांना समाजाच्या मुख्य धारेत सामावून घेणे आणि त्यांचे सक्षमीकरण करण्याचा असल्याचं केंद्रीय आरोग्य मंत्री जे.पी. नड्डा यांनी म्हटलं आहे. योजनेच्या दशकपूर्तीनिमित्त दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. सुदृढ बाळासाठी, गर्भवतीच्या आरोग्याच्या काळजीपासून ते प्रसुतीपर्यंतच्या आरोग्य सेवेचे महत्त्व तसंच सर्व तपासण्या, लसीकरणाचं महत्त्व अधोरेखित केलं. केंद्रीय महिला आणि बालविकासमंत्री अन्नपूर्णा देवी यांनीही योजनेचे यश हे सरकार, समाज आणि स्थानिक समुदायांच्या सामूहिक प्रयत्न, योगदानाचा परिणाम असल्याचं प्रतिपादन यावेळी केलं. तर केंद्रीय महिला आणि बालविकास राज्यमंत्री सावित्री ठाकूर म्हणाल्या की, मुलींविषयीच्या विचारसरणीत आणि वर्तनात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठीची चळवळ झाली आहे.

**ट्रम्प खटला**

अमेरिकेतील जन्मसिद्ध नागरिकत्व रद्द करण्याच्या योजनेबद्दल डेमोक्रॅटिक पक्षाची सत्ता असलेली राज्यं आणि नागरी हक्क गटांच्या युतीनं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यावर खटला दाखल केला आहे. कोलंबिया आणि सॅन फ्रान्सिस्को शहरासह 22 डेमोक्रॅटिक पक्षाच्या नेतृत्वाखालील राज्यांनी बोस्टन आणि सिएटल इथल्या संघीय न्यायालयांमध्ये हे खटले दाखल केले. ट्रम्प यांनी पदभार स्वीकारल्यानंतर काही तासांतच अमेरिकेतील स्थलांतराला नियंत्रित करण्याच्या उद्देशानं एकगठ्ठा कार्यकारी आदेश जारी केले. अध्यक्षांनी आपल्या अधिकारांचं उल्लंघन केलं आहे आणि अमेरिकेच्या भूमीवर जन्मलेल्या कोणालाही आपोआप नागरिकत्व देण्याची पद्धत रद्द करण्याचा प्रयत्न करून अमेरिकन संविधानाचं उल्लंघन केल्याचा आरोप या खटल्यांमध्ये करण्यात आला आहे.

**सकल देशांतर्गत**

देशाची डिजीटल अर्थव्यवस्थेचं सकल देशांतर्गत उत्पन्नातलं योगदान येत्या पाच वर्षात एक पंचमांश होऊ शकतं अशी माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं काल प्रकाशित केलेल्या भारताच्या डिजीटल अर्थव्यवस्थेचा अंदाज आणि मापन या व्यापर अहवालात दिली आहे. हा अहवाल देशाला संसाधनाचे समायोजन करणे आणि उपयुक्त विकास धोरणे आखण्यास उपयोगी ठरू शकतो. अशा प्रकारे डिजीटल अर्थव्यवस्थेचा देशांतर्गत उत्पादनात समावेश असणारा मोजक्याच देशांपैकी एक आणि विकसनशील देशांमध्ये भारत पहिला असेल असंही मंत्रालयानं नमूद केलं आहे.

**जीआयटॅग**

2030 पर्यंत देशात 10 हजार भौगोलिक मानांकन म्हणजेच जीआय टॅग्ज मिळवण्याचं लक्ष्य ठेवलं असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी काल नवी दिल्लीत सांगितलं. GI संमेलनाला संबोधित करताना, हे लक्ष्य संपूर्ण सरकारी दृष्टिकोनातून साध्य केले जाईल आणि सरकार यावर देखरेख करण्यासाठी एक समिती स्थापन करणार असल्याचंही गोयल यांनी सांगितलं. उद्योग विभागानं आतापर्यंत 605 भौगोलिक मानांकनं जारी केले आहेत.

**पराक्रम दिवस**

नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या 128 व्या जयंतीनिमित्त आज पराक्रम दिवस साजरा केला जाणार आहे. सांस्कृतिक मंत्रालयाकडून तीन दिवसांचा उत्सव नेताजींच्या जन्मस्थानी ओडिशातल्या कटक इथं आयोजित केला जाणार आहे.

**प्रजासत्ताक तयारी**

76 व्या प्रजासत्ताक दिनाच्या संचलनामध्ये विविध राज्यं, केंद्रशासित प्रदेश आणि केंद्रीय मंत्रालयांचे 26 चित्ररथ सहभागी होणार आहेत, स्वर्णिम भारतः विराट और विकास ही यंदाची

संकल्पना आहे. या वर्षी सशक्त आणि सुरक्षित भारत या संकल्पनेसह तीनही संरक्षण दलांचे चित्ररथ संचलनामध्ये पहायला मिळणार आहेत.

**जळगाव अपघात**

जळगाव जिल्ह्यातील पाचोरानजीक परधाडे स्थानकाजवळ काल संध्याकाळी झालेल्या रेल्वे अपघातातील मृत 12 प्रवाशांमध्ये 8 पुरुष, दहा वर्षांचं बालक आणि तीन महिलांचा समावेश आहे. जळगाव जिल्हाधिकारी कार्यालयातील 0257-22 17 193 या क्रमांकावर हेल्पलाईन सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. मदत कार्य रात्री उशिरापर्यंत सुरू होतं. अपघातामुळं मुंबईकडून येणाऱ्या जाणाऱ्या सुमारे 8 गाड्या दीड ते दोन तास खोळंबल्या होत्या. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या दुर्घटनेबाबत दुःख व्यक्त करत मृतांच्या वारसांना 5 लाख रुपये आर्थिक साहाय्य जाहीर केलं. राष्ट्रपती, पंतप्रधान, गृहमंत्र्यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे.

**खेलोइंडिया**

खेलो इंडियाच्या या वर्षाच्या हंगामातल्या, हिवाळी क्रीडा स्पर्धांची सुरूवात आज लडाखमध्ये होत आहे. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री मनसुख मांडवीय यांच्या हस्ते स्पर्धेचं उद्घाटन होणार आहे. लडाख मध्ये दुसऱ्यांदा खेलो इंडियाचं आयोजन केलं जात असून, या हंगामाचा दुसरा टप्पा फेब्रुवारीत जम्मू आणि काश्मिरमध्ये होणार आहे.

**बॅडमिंटन**

इंडोनेशिया इथं खेळल्या जाणाऱ्या मास्टर्स सुपर फाईव्ह हंड्रेड बॅडमिंटन स्पर्धेत, दुसऱ्या फेरीतले सामने आज होणार आहेत. पुरूष दुहेरीत भारताच्या लक्ष्य सेनचा सामना जपानच्या केंटा निशिमोटा यांच्याशी होणार आहे. तर पुरूष दुहेरीतही दुसऱ्या फेरीत चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रँकीरेड्डी जोडीचा मुकाबला थायलंडच्या जोडीशी होणार आहे. मिश्र दुहेरीत तनिशा क्रास्टो आणि ध्रुव कपिला यांचा मुकाबला मलेशियाच्या जोडीशी होणार आहे. तसंच महिला दुहेरीच्या सामन्यात अश्विनी पोनप्पा आणि तनिशा यांच्या जोडीचा सामना मलेशियाशी होणार आहे. या स्पर्धेत महिला एकेरीच्या सामन्या पी. व्ही. सिंधुला खाते उघडण्यात काल अपयश आलं.

**क्रिकेट**

वीस षटकांच्या क्रिकेट मालिकेत भारतानं काल कोलकाता इथं झालेल्या पहिल्या सामन्यात इंग्लंडचा सात गडी राखून पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना इंग्लंडच्या सर्वबाद 132 धावा झाल्या, भारतानं हे लक्ष्य तेराव्या षटकातच तीन गडी गमावून पूर्ण केलं. अभिषेक वर्मानं 34 चेंडूत 79 धावा करत सर्वाधिक वाटा उचलला, त्यानं केवळ 20 चेंडूत पन्नास धावा ठोकल्या. दुसरा सामना चेन्नई इथं शनिवारी होणार आहे.

याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.